Cambridge International A Level

**Cambridge International Examinations**
Cambridge International Advanced Level

**MARATHI** **9688/04**

Paper 4 Texts **October/November 2016**

**2 hours 30 minutes**

No Additional Materials are required.

*9040681399*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

An answer booklet is provided inside this question paper. You should follow the instructions on the front cover of the answer booklet. If you need additional answer paper ask the invigilator for a continuation booklet.

Answer **three** questions, each on a different text. You must choose **one** question from Section 1, **one** question from Section 2 and **one other**.
Write your answers in **Marathi**.
Dictionaries are **not** permitted.
You may **not** take set texts into the examination.

You should write between 500 and 600 words for each answer.
All questions in this paper carry equal marks.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा**

उत्तरपुस्तिका ही प्रश्नपत्रिकेत सामावलेली आहे. दिलेल्या उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा. सूचना मराठीतूनही खाली दिलेल्या आहेत. अधिक पृष्ठांची जरुरी असल्यास पर्यवेक्षकांकडे मागावीत आणि पृष्ठांचा क्रम चालू ठेवावा.

कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांवर आधारित असावा. विभाग 1 मधून **एक** प्रश्न, विभाग 2 मधून **एक** प्रश्न व उरलेला **एक** प्रश्न कोणत्याही विभागातून सोडवा.
प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.
शब्दकोषांचा वापर करण्यास **मनाई आहे.**
परिक्षेत पाठ्यपुस्तकांचा वापर करण्यास **मनाई आहे**.

प्रत्येक उत्तर 500 ते 600 शब्दांच्या मर्यादेत असावे.
या प्रश्नपत्रिकेत प्रत्येक प्रश्नाला समान गुण दिले आहेत.

उत्तरपत्रिका भरण्यासाठी मराठीतून लिहिलेल्या सूचना या प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठ क्रमांक २ वर पहा.


This document consists of **6** printed pages, **2** blank pages and **1** Insert.



© UCLES 2016

**उत्तरपुस्तिकेसाठी सूचना**

उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावरील नमूद केलेल्या रिकाम्या जागा ठळक अक्षरात भरा.
गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे. कृपया बारकोडवर काहीही लिहू नका.
उत्तर पुस्तिकेत तुमच्या प्रश्नांची उत्तरे लिहा. पृष्ठाच्या दोन्ही बाजूंचा वापर करा. प्रत्येक दोन उत्तरांच्या मध्ये दोन ओळी मोकळ्या सोडा.
तुम्ही लिहित असलेल्या उत्तराचा प्रश्न क्रमांक पहिल्या समासात लिहा.




तुम्ही लिहित असलेल्या प्रश्नाला जर उपप्रश्न असेल, उदा: 1a, तर उपप्रश्नक्रमांक, दुसऱ्या समासात लिहा.

अधिक उत्तरपृष्ठ क्रमशः वापरली असल्यास ती सर्व पृष्ठे उत्तरपुस्तिकेत एकत्र ठेवावीत.

© UCLES 2016 

**BLANK PAGE**

© UCLES 2016  [Turn over

## विभाग 1

**1 सार्थ श्री ज्ञानेश्वरी – संत ज्ञानेश्वर – अध्याय बारावा (ओवी क्रमांक 83–94)**

**विभाग (a) किंवा विभाग (b) निवडा.**

**(a)** किंबहुना, धनुर्धरा! जो मातेचिया ये उदरा । तो मातेचा सोयरा । केतुला पां! ||८३||
तेवी मी; तयां । जैसे असती तैसिया । कळिकाळ नोकोनियां । घेतला पटा ||८४||

एऱ्हवी तरी, माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता? । काय समर्थाची कांता! । कोरान्न मागे? ||८५||

तैसे, ते माझे । कलत्र हे जाणिजे । कायिसेनिही न लाजें । तयांचेनि मी ||८६||
जन्ममृत्यूचां लाटी । झळंबती इया सृष्टी । ते देखोनिया, पोटी । ऐसे जाहले ||८७||
भव सिंधूचेनि माजें । कवणासि धाकु नुपजे । येथ जरी की माझे । बिहिती हन? ||८८||
म्हणौनि, गा पांडवा । मूर्तीचा मेळावा । करुनि, त्यांचिया गावा । धावतु आलों ||८९||
नामाचिया, सहस्त्रवरी । नावा इया अवधारी! । सजूनिया, संसारी । तारू जाहलो ||९०||
सडे जे देखिले । ते ध्यानकासे लाविले । परिग्रही, घातले । तरियावरी ||९१||
प्रेमाच्या पेटी । बांधली एकाचां पोटी । मग आणिलें तटी । सायुज्याचां ||९२||
परि, भक्तांचेनि नांवे । चतुष्पदादि आघवे । वैकुंठीचिये राणिवे । योग्य केले ||९३||
म्हणौनि गा भक्तां, नाही एकही चिंता । तयातें समुद्धर्ता । आथि मी सदा ||९४||

**(i)** भगवान श्रीकृष्णाच्या भक्तांवरच्या प्रेमाचे वर्णन करताना कोणत्या उपमा वापरल्या आहेत?
**(ii)** भगवान श्रीकृष्ण गोंधळलेल्या अर्जुनाचे कसे सांत्वन करतात? [25]

अथवा

**(b)** अभ्यासक्रमात नमूद केलेल्या अभंगांच्या आधारे बाराव्या अध्यायातील आशयाचे उदाहरणांसह प्रतिपादन करा. [25]

**2** **सार्थ श्री तुकारामाची गाथा – संत तुकाराम (अभंग क्रमांक 1446–1448)**

**विभाग (a) किंवा विभाग (b) निवडा.**

**(a)**

निवडावे खडे । तरी दळण वोजें (वोज) घडे ॥ १ ॥
नाहीं तरि नासोनि जाय । कारण आळस उरे हाय ॥ २ ॥
निवडावे तन । सेती करावे राखण ॥ ३ ॥
तुका म्हणे नीत । न विचारिता नव्हे हित ॥ ४ ॥

दुर्जनाचा मान । सुखे करावा खंडन (ण) ॥ १ ॥
लाता हाणोनिया वारी । गुंडा वाट शुद्ध करी ॥ २ ॥
बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥ ३ ॥
तुका म्हणे नखें । काढुनी टाकिजेती सुखें ॥ ४ ॥

नका धरू कोणी । राग वचनाचा मनी ॥ १ ॥
येथें बहुतांचें हित । शुद्ध करोनी राखा चित्त ॥ २ ॥
नाहीं केली निंदा । आम्ही दुषिलेंसे भेदा ॥ ३ ॥
तुका म्हणे मज । येणेंविण काय काज ॥ ४ ॥

**(i)** वरील अभंगांच्या संदर्भात 'खड्याची' उपमा कोणाला दिली आहे आणि का?
**(ii)** 'लाथाडलेला दगड' कोणाला म्हटले आहे आणि का?
**(iii)** संत तुकारामांच्या मनोभूमिकेचे वर्णन करा. [25]

**अथवा**

**(b)** अभ्यासक्रमात नमूद केलेल्या अभंगांच्या आधारे संत तुकारामांचे विविध भक्तिभाव उदाहरणांसह स्पष्ट करा. [25]

© UCLES 2016

**3** **'ह्या नभाने' – ना.धों. महानोर**

**विभाग (a) किंवा विभाग (b) निवडा.**

**(a)**

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि ह्या मातीतुन चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लखडून जावे

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि माझ्या पापणीला पूर यावे
पाहता ऋतुगंध कांती सांडलेली
पाखरांशी खेळ मी मांडून गावे

गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुनी बेहोष होता
शब्दगंधे, तू मला बाहूत घ्यावे.

**(i)** निसर्गाकडून कवीच्या कोणत्या अपेक्षा आहेत?
**(ii)** कवीमनाची अंतिम इच्छा कोणती? [25]

**अथवा**

**(b)** एक 'निसर्गकविता' म्हणून या कवितेचे स्पष्टीकरण करा. [25]

## विभाग 2

**4 'ती फुलराणी' – पु. ल. देशपांडे**

**विभाग (a) किंवा विभाग (b) निवडा.**

**(a)** 'ती फुलराणी' या नाटकातील कोणतीही एक व्यक्तारेखा उदाहरणांद्वारे स्पष्ट करा. [25]

**अथवा**

**(b)** 'ती फुलराणी' या नाटकाचे लेखक पु. ल. देशपांडे, यांच्या प्रतिभेचे विविध पैलू उदाहरणांद्वारे स्पष्ट करा. [25]

**5 मराठी लघुकथा – कथा संग्रह**

**विभाग (a) किंवा विभाग (b) निवडा.**

**(a)** 'माणूस जगतो कशासाठी?' या ना. सी. फडके यांच्या कथेत भास्कर दामले आत्महत्येचा विचार निश्चित करून शेवटी का बदलतो? [25]

**अथवा**

**(b)** 'माझे दत्तक वडील' या चिं. वि. जोशी यांच्या कथेत अण्णा फाटक, चिमणरावांची कशी फसवणूक करतात? [25]

**6 'पावनखिंड' – कादंबरी – रणजित देसाई**

**विभाग (a) किंवा विभाग (b) निवडा.**

**(a)** 'पावनखिंड' या ऐतिहासिक कादंबरीतील बाजी प्रभू देशपांड्यांच्या अंतिम त्यागाचे स्पष्टीकरण करा. [25]

**अथवा**

**(b)** 'पावनखिंड' या कादंबरीकाराच्या प्रतिभेचे निवडक उदाहरणांच्या आधारे विश्लेषण करा. [25]

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

To avoid the issue of disclosure of answer-related information to candidates, all copyright acknowledgements are reproduced online in the Cambridge International Examinations Copyright Acknowledgements Booklet. This is produced for each series of examinations and is freely available to download at www.cie.org.uk after the live examination series.

Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.